# मानक क्रमांक -21

**1.5.2 शाळा वर्गातील आंतरक्रियांमध्ये भारताचा वारसा, सभ्यता,नैतिकता आणि मुल्यांचे ज्ञान समाविष्ट असल्याचे सुनिश्चित करते आणि विद्यार्थ्यांना समाज,प्राणी आणि निसर्गाप्रती कर्तव्याची जाणीव ठेवण्यास प्रोत्साहित करते.**

## निवडलेला स्तर 4

**४.१ विद्यार्थ्यांना त्यांच्या समाज, प्राणी, निसर्गाप्रती असलेल्या कर्तव्याची जाणी करून दिली जाते.**

**१.१ सर्व शिक्षकांना भारतीय संस्कृतीचा वारसा, सभ्यता आणि नैतिकता याचे पुरेसे ज्ञान आहे.**

इंदिरा कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना भारतीय संस्कृन्तीचा वारसा, सभ्यता आणि नैतिकता याचे पुरेसे ज्ञान आहे, कारण ते विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात आणि समाजाच्या नैतिक मूल्यांच्या जतनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

**२.१ वर्गातील आंतरक्रियात भारतीय संस्कृतीचे ज्ञान, भारताचा समृद्ध वारसा, आचार आणि मूल्ये अंतर्भूत केले जातात.**

भारतीय संस्कृतीत विविध सण, कला, संगीत, नृत्य, साहित्य आणि परंपरांचा समावेश आहे. शालेय शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना या घटकांची ओळख करून दिल्यास, ते आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगू शकतात आणि तिचे संरक्षण व संवर्धन करण्यास सक्षम होतात.

**३.१ इतर देशातील सर्व संस्कृतीचा आदर करताना विद्यार्थ्यांना भारताच्या इतिहासाचा आणि वारशाचा अभिमान वाटतो.**

इंदिरा कनिष्ठ महाविद्यालयात इतर देशांच्या संस्कृतींचा आदर करणे हे जागतिक नागरिक होण्यासाठी आवश्यक आहे हे शिकवतात. पण त्याच वेळी, आपल्या इतिहासाचा, परंपरांचा आणि संस्कृतीचा अभिमान बाळगणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे.

**३.२ विद्यार्थी त्यांच्या निर्णय आणि कृतींचे मार्गदर्शन करणारी मूल्ये आणि तत्त्वे ओळखतात. उदाः 'एक भारत श्रेष्ठ भारत' अंतर्गत विविध उपक्रम हाती घेतले जातात**

विद्यार्थ्यांसाठी मूल्ये आणि तत्त्वे ओळखणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण तीच त्यांच्या निर्णयांना आणि कृतींना दिशा देतात. 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना विविध राज्यांतील भाषा, परंपरा, आणि जीवनशैली यांचे ज्ञान मिळते, ज्यामुळे एकता आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागते. उदाहरणार्थ, संस्कृती विनिमय कार्यक्रम, भाषाशिक्षण उपक्रम, सांस्कृतिक महोत्सव, यांसारख्या उपक्रमांमधून विद्यार्थी वेगवेगळ्या संस्कृतींशी जोडले जातात.

**४.१ विद्यार्थ्यांना त्यांच्या समाज, प्राणी, निसर्गाप्रती असलेल्या कर्तव्याची जाणी करून दिली जाते.**

इंदिरा कनिष्ठ महाविद्यालयात, विद्यार्थ्यांना समाज, प्राणी आणि निसर्ग यांच्याप्रती असलेल्या कर्तव्यांची जाणीव करून देऊन,काही प्रभावी उपक्रम राबवले जातात जसे, अनाथालये, वृद्धाश्रम भेटी, स्वच्छता मोहिम, झाडे लावा, झाडे जगवा अभियान, निराधार आणि जखमी प्राण्यांसाठी मदत इत्यादी.




भारतीय संस्कृतीचे जतन



भारतीय संस्कृतीचा परिचय




भारतीय ज्ञान परंपरा









कला, संगीत, नृत्य




भाषाशिक्षण उपक्रम








वृद्धाश्रम भेटी, वृक्षारोपण, जखमी प्राण्यांसाठी मदत

P. B. Mandake.
PRINCIPAL
Indira Mahavidyalaya
Kalamb Dist. Yavatmal